मैंदर्गी नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणे हटवा

आ. कल्याणशेट्टी यांची अधिवेशनात मागणी

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील मैंदर्गी नगरपरिषदेत मागील कित्येक दिवसांपासून अतिक्रमण हटवण्यासाठी लोकांनी अर्ज केले आहेत. यावर प्रशासनाने १६ एप्रिल २०२५ रोजी अतिक्रमण काढल्याचे उत्तर दिले आहे. मात्र अद्याप नगरपरिषद हद्दीत अनेक अतिक्रमणे प्रलंबित आहेत. याबाबत महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रश्न उपस्थित करत सभागृहाचे लक्ष वेधले.

जे अतिक्रमण काढले गेले आहे ते तात्पुरते आहे. मैंदर्गी हे शहर अक्कलकोट-गाणगापूर या रस्त्यावर आहे. गाणगापूर हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून अशा ठिकाणी अत्यंत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे.ज्या विशिष्ट जागेतील अतिक्रमण काढले गेले आहे, त्या व्यतिरिक्त इतर अतिक्रमणे त्वरित काढण्याच्या सूचना देणार का? काही जागा नगरपरिषदेच्या हद्दीला लागून महसूल विभागाच्या अखत्यारीतील आहेत. त्यांची मोजणी अद्याप झालेली नाही, त्यामुळे ते अतिक्रमण प्रलंबित आहे. यासंदर्भात बैठक आयोजित करून उरलेल्या अतिक्रमणांवर लवकरात लवकर कारवाई करणार का? असा प्रश्न आ. कल्याणशेट्टी यांनी विचारला.

लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन

प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उर्वरित अतिक्रमणे हटवण्याचे स्पष्ट केले. यासंदर्भात लवकरच बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिल्याचे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगसाठी कॅप राऊंड-२ गुरुवारपासून

१९ जुलैपर्यंत चालणार प्रक्रिया

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशाची दुसरी फेरी (सेकंड कॅप राऊंड) गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ पासून सुरु होणार असून ती प्रक्रिया शनिवार, दि.१९ जुलै २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे.

या कालावधीत स्वेरी डिप्लोमाच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी. क्रमांक ६४३७) मध्ये कॅप राउंडसाठी ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय केली आहे. या प्रवेशाची अलॉटमेंट यादी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सोमवार दि.२१ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. अशी माहिती स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलीटेक्निक) चे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी दिली.

गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ पासून द्वितीय प्रवेश फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरणे सुरु होणार असून ती प्रक्रिया शनिवार, दि.१९ जुलै २०२५ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत चालणार आहे. पहिल्या फेरीत ज्यांना इच्छुक महाविद्यालय व ब्रांच मिळाले नाही अशा विद्यार्थ्यांना या दुसऱ्या कॅप राऊंडचा लाभ घेता येणार आहे. दुसऱ्या फेरीसाठी जागावाटप सोमवार, दि.२१ जुलै २०२५ रोजी अधिकृत संकेतस्थळावरून प्रदर्शित केले जाईल. दुसऱ्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची स्वीकृती मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ ते गुरुवार दि. २४ जुलै २०२५ या दरम्यान करता येईल. प्रथम वर्ष डिप्लोमाच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रा.एस. एस.गायकवाड (मो. ९८९०५६६२८१) व प्रा. जे. बी. रोडगे (मो. ९७६७८५६०२९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

तुझ्या माझ्या प्रेमाची जोडी जोडी...
एकत्र राहण्यासाठी केली आत्महत्येच्या बनावाची खेळी खेळी...

वस्तीवरील कडब्याच्या गंजित अनोळखी महिला जळताना; जिवंत किरण होती कऱ्हाडला प्रियकर निशांतच्या मिठीत!

- पळून जाऊन कायमचे एकत्र राहण्यासाठी प्रियकर अन् प्रेयसीने आत्महत्येचा केला बनाव
- एखाद्या हॉरर चित्रपटाला साजेल अशी स्टोरी घडली मंगळवेढा तालुक्यातील पाठखळला
- पोलिसांच्या चौकशीने किरण सावत प्रकरणाला अत्यंत धक्कादायक लागले वळण

✔ मंगळवेढा-सोलापूर/प्रतिनिधी

संशयित निशांत सावत


संशयित किरण सावत

एखाद्या हॉरर चित्रपटाला साजेल अशी प्रेमीयुगलांची स्टोरी मंगळवेढा तालुक्यातील पाठखळ येथे घडली आहे. प्रियकर निशांत सावत आणि प्रेयसी किरण सावत या दोघांना पळून जाऊन कायमचे एकत्र राहायचे होते. त्यासाठी या दोघांनी आत्महत्येचा बनाव केला. किरण हिने आत्महत्या केली आहे, हे दर्शवण्याठी चक्क एका अनोळखी महिलेच्या आत्महत्येचा प्रकार घडवून आणला. पाठखळमधील सावत वस्तीवर घराशेजारील कडब्याच्या गंजित संबंधित महिलेस घालून गंज पेटवून दिली. कडब्याच्या गंजित महिला जळत असतानाच प्रेयसी किरण सावत ही कऱ्हाडला प्रियकर निशांत सावतच्या मिठीत होती, अशी माहिती समोर आली आहे.

दरम्यान करायले गेले एक आणि झाले दुसरेच असा प्रकार या घटनेदरम्यान झाला आहे. संबंधित अनोळखी महिलेस जाळून किरण सावत हिनेच आत्महत्या केल्याचे दर्शवण्याचा बनाव या दोघांच्या अंगलट आला. अनोळखी महिलेचा सुरुवातीला गळा आवळून खून केला आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी तिने आत्महत्या केल्याचा बनाव रचला या प्रकरणात प्रियकर निशांत आणि प्रियेशी किरण या दोघांवर मृत्यूला जबाबदार असल्याचा गुन्हा मंगळवेढा पोलिस ठाण्यात मंगळवार (ता.१५) दाखल करण्यात आला आहे.

विशेषत्वे, डोके चक्रावणाऱ्या या प्रकरणात मंगळवेढा पोलिसांनी तांत्रिक कौशल्याच्या आधारे या घटनेचा छडा लावला आहे. सुरुवातील किरण सावत हिने कडब्याच्या गंजित पेटवून घेऊन आत्महत्या केली असे समोर आले होते. याच अनुषंगाने, मंगळवेढा पोलिस ठाण्यात फिर्याददेखील दाखल झाली होती. मात्र पोलिसांनी केलेल्या चौकशीतून या प्रकरणाने धक्कादायक वळण घेतले आहे.

पाठलाग बातमीचा...

किरण सावत हिच्याबद्दल तिच्या सासरच्या मंडळींकडून सांगितली गेलेली हकिगत आणि घटनास्थळावरील परिस्थिबती यामध्ये प्रचंड विसंगती पोलिसांच्या लक्षात आली. ही घटना आत्महत्या नसून खुनाचा प्रकार असल्याचा संशयदेखील बळावला होता. मात्र, तांत्रिक विश्लेषणाच्या साहाय्याने मंगळवेढा पोलिसांनी चौकशी गती दिली आणि सत्य समोर आले.

प्रियेशी किरण ही कऱ्हाडला असल्याचे लोकेशन पोलिसांना तांत्रिक साहाय्याने मिळाले. तद्नंतर पोलिस आणि काही नातेवाईक हे कऱ्हाडला रात्रीच पोचले. पहाटेच्या दरम्यान पोलिस पथकाने किरणला सुरुवातीला ताब्यात घेतले. त्यानंतर प्रियकर निशांत यालादेखील ताब्यात घेतले. या दोघांनाही विश्वासात घेऊन पोलिसांनी चौकशी केली तेव्हा खरा प्रकार समोर आली. खास करुन कडब्याच्या गंजिमध्ये जाळलेली ती अनोखळी महिला कोण? याचे कोडे मात्र अजून उलगडलेले नाही. किरण आणि निशांत यांच्या कसून चौकशीतून हे कोडे उलगडणार आहे.

अनोळखी महिलेची जीवनयात्रा संपविण्यात प्रेमीयुगल किरण अन् निशांत या दोघांचाही हात

कायमचे एकत्र राहण्यासाठी आत्महत्येचा कट प्रेमीयुगल किरण आणि निशांत यांनी रचला. अनोळखी महिलेचा गळा आवळून खून करणे आणि त्यानंतर तिला कडब्याच्या गंजित घालून गंज पेटवून देणे या सगळ्या प्रकारात किरण आणि निशांत या दोघांचा वाटा असल्याचे पोलिस तपासातून सिद्ध झाले आहे.

बिचाऱ्या नागेश सातवला सोमवारी रात्रीच पोलिसांनी दिले सोडून

घटनेच्या पार्श्वभूमीवर, किरण हिचा नवरा नागेश याला काल सोमवारीच पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याच्याकडून या प्रकरणाचा उलगडा होईल, असे सुरुवातीला पोलिसांना वाटले होते. मात्र हे प्रकरण धक्कादायक वळणावर गेले. घटनेत बिचाऱ्या नागेश दोषी नसल्याचे सकृतदर्शनी आढळल्याने त्यांना सोमवारी रात्री पावणे बारा वाजवण्याच्या सुमारास सोडून दिले.

किरणचा मोबाईल ठेवला महिलेच्या मृतदेहावर

घटनेच्या अनुषंगाने, मोबाईलचा तपास झाल्यास अवघड होईल म्हणून किरण आणि निशांत या दोघांच्या विचाराने किरणचा मोबाईल संबंधित मृत महिलेच्या पोटावर मोबाईल हँडसेट ठेवून कडब्याच्या गंजिला आग लावून देण्यात आली.

किरण सडणार जेलमध्ये बिचाऱ्या आरोहीचे काय?

संशयित किरण हिला आरोही ही दोन वर्षाची मुलगी आहे. आई किरण ही मृत्यूला कारणीभूत ठरण्यातून अनेक वर्ष जेलमध्ये सडेल. या दरम्यान आरोहीला आईविना रहावे लागेल.

- प्रियकराच्या मदतीने विवाहितेचा आत्महत्येचा बनाव
- खरे वाटण्यासाठी तिसऱ्याच महिलेची हत्या करुन जिवंत जाळले
- मंगळवेढ्यातील खुनाची सस्पेन्स स्टोरी उलगडली
- पोलिसांच्या गतीमान चौकशीचे आणि घटनेचा छडा लावण्याचे कौतुक

संक्षिप्त वृत्त

लकी चौकातून गाडी चोरीला

✔ **सोलापूर :** लकी चौक येथे पार्क केलेली ७० हजार रुपये किंमतीची पांढऱ्या रंगाची होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोटारसायकल (क्र. एमएच १३ बीएक्स ६६५५) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना (१४ जुलै) रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे. राकेश अशोक सिंदगीकर, माशाळ वस्ती, विजापूर रोड (वय ४९ वर्षे, रा. प्लॉट नं. ६) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलीस हवालदार परीट हे करीत आहेत.

घराचा दरवाजा उघडून मोबाईल लंपास

✔ **सोलापूर :** शहरातील रेवणसिध्देश्वर नगर येथे (दि. १३) जुलै रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास नोकिया कंपनीचा सुमारे १५ हजार ६५३ रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. राहत्या घराचा दरवाजा उघडा ठेवून झोपले असता अज्ञात चोरट्याने खोलीमध्ये प्रवेश मोबाईल फोन चोरून नेला आहे. बसवराज गुरुपादप्पा माळी पाटील (वय ६३ वर्षे, रा. रेवणसिध्देश्वर नगर, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात (दि.१४) जुलै रोजी तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार पापडे हे करत आहेत.

युवकाला मारहाण करत मोबाईलसह रोख रक्कम लंपास

✔ **सोलापूर :** सुपर मार्केट येथील एम.एस.ई.बी ऑफिसकडे जाणाऱ्या रोडवर मोटार सायकलवर आलेल्या तीन अनोळखी इसमांनी तरुणास मारहाण करुन १४ हजार रुपयांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल व १ हजार ८५० रोख रक्कम असा १५ हजार ८५० रूपयांचा ऐवज जबरदस्तीने चोरल्याची घटना (दि.१३) जुलै रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे. मयुर बसवराज व्हट्टे, (वय ४२ वर्षे. रा. राजदिप मेडीकलजवळ, चौपाड ५०९, उत्तर कसबा, सोलापूर, सध्या धरमशी लाईन अमृततुल्य हॉटेलजवळ, मुरारजीपेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरोधात मंगळवार दि. १५ जुलै रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

बार्शीच्या युवकाची मार्केट यार्डातून मोटारसायकल चोरीला

✔ **सोलापूर :** सोलापूर मार्केट यार्डात फुले घेण्यासाठी गेलेल्या बार्शीच्या युवकाची ५० हजार रुपये किंमतीची लाल व काळ्या रंगाची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल चोरून नेल्याची घटना (दि. १०) जुलै रोजी सकाळी सोलापूर येथील मार्केट यार्ड येथे घडली आहे. एमएच १३ सीएम ८३२३ असा त्या मोटरसायकलचा क्रमांक आहे. अमोल अविनाश गुरव (वय ३९ वर्षे, रा. संतनाथ मंदिराजवळ, मु.पो. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून मंगळवार दि. १५ जुलै रोजी अज्ञात चोरट्याविरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार नदाफ हे करीत आहेत.

सोलापूर महापालिकेची 'टू इन वन' शाळा; सकाळी विद्यार्थ्यांची तर रात्री भरते तळीरामांची स्कूल!

: विद्येच्या प्रांगणात दारूच्या बाटल्यांचा खच : पालकांमधून व्यक्त केला जातोय तीव्र संताप
: दारुड्यांच्या त्रासाबरोबरच शाळेमधील असुविधांचादेखील विद्यार्थ्यांना त्रास

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर : महापालिका शिक्षण मंडळाच्या शाळा क्रमांक १६ ची झालेली दुरावस्था.

सोलापूर : महापालिका शिक्षण मंडळाच्या या शाळेच्या व्हरांड्यात तळीरामांनी फेकून दिलेल्या बाटल्यांचे असे दर्शन होते.

सोलापूर महापालिकेच्या शाळा क्रमांक १६ मध्ये सकाळी विद्यार्थ्यांची तर रात्री तळीरामांची शाळा भरत असल्याचे विदारक चित्र दिसत आहे. शाळेच्या व्हरांड्यात तसेच आवारात विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्यांचा खच पडलेला असतो. त्यामुळे शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांनी नेमका आदर्श कोणाचा घ्यायचा असा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्याशिवाय जीर्ण असलेली शाळेची इमारत धोकादायक अवस्थेत आली असताना याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पडक्या आणि धोकादायक अवस्थेतील या इमारतीला केवळ डागडूजीची तात्पुरत्या स्वरुपात मलमपट्टी करण्यात आली आहे. त्यामुळे या शाळेत शिक्षण येणाऱ्या विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून शिक्षण घ्यावे लागत आहे.

दरम्यान, महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना गेल्या कित्येक वर्षांपासून अशा धोकादायक इमारतीत अध्ययन अध्यापनाचे कार्य करावे लागत आहे. शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नेहमी धोकादायक अवस्थेतील इमारतींमध्ये जीव मुठीत धरून वावरावे लागत आहेत. कधी कुठला भाग कोसळेल याचा काही नेम नाही. शाळेतील अनेक भागात जीर्ण झालेले, भिंती, कठडे, उघड्यावर आलेल्या स्लॅबच्या सळया मोडकळीस आलेले दरवाजे, इतरत्र पडलेले दारूच्या बाटल्या, अशा एक ना अनेक समस्याच्या गर्तेत महापालिकेची शाळा सापडली आसून विद्यार्थी शिक्षकांसाठी ही समस्या जीवघेण्या ठरत आहेत. महापालिका प्रशासनाने शाळेच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून बांधकाम करणे आवश्यक असताना तसे न करता मक्तेदाराला शाळेचे काम सोपवून हात झटकले आहेत. गेल्या वर्षभरापूर्वीच शाळेचे बांधकाम तसेच वर्ग खोलीतील फरशीकरण, किरकोळ डागडुजी अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्यात विद्यार्थ्यांना शिक्षण येणे धोकादायक ठरत आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. शाळेच्या नूतनीकरणासाठी आणि देखभाल दुरुस्तीसाठी संबंधित मुख्याध्यापकांनी पत्रव्यवहार आणि प्रस्ताव दाखल केला आहे. त्यानंतर या कामकाजाला सुरुवात झाली खरी परंतु झालेले काम हे केवळ लाव लीजाव टिमकी बजाव अशा स्वरूपात झाल्याचे चित्र आहे. पडक्या आणि धोकादायक अवस्थेतील शाळा जणू मृत्यूचेच आमंत्रण देत आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

संतप्त पालकांचा 'हा' सवाल

शाळेतील विद्यार्थी नेहमी दडपणाखाली राहतात. शाळेची अवस्था पाहिली असता शाळा कधी पडेल अशी झालेली आहे. तरीदेखील महापालिका प्रशासन, प्राथमिक शिक्षण मंडळ आणि शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. आमची मुलं या शाळेत शिक्षण घेताना कोणती अप्रिय घटना घडल्यास त्याला कोण जबाबदार राहणार अशी संतप्त पालकांमधून व्यक्त केली जात आहे.

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाची एवढी बेपर्वाई कशी?

सोलापूर महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक १६ येथील परिसरात नेहमीच दारुड्यांची जत्रा भरत असल्याचे निदर्शनास येत आहे. रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी येथे बेत आखला जातो. भरदिवसाच तळीरामांकडून अनेक दारूच्या बाटल्या घशात रित्या केल्या जातात. दारूच्या बाटल्यांचा खच सापडल्याने विद्याचे माहेरघरात दारुड्यांची शाळा भरत असल्याचे विदारक दृश्य पाहावयास मिळत आहे.

शिक्षण मंडळाच्या निष्क्रीय कारभाराचा विद्यार्थ्यांना त्रास

या इमारतीमध्ये पूर्व प्राथमिक, प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळा अशा तिन्ही स्तरावरील वर्ग भरतात. शाळेची जीर्ण इमारत, ओजोरांचा ढीग, अपुऱ्या भौतिक सुविधा आणि तळीरामांचा वाढेलेला हैदोस अशा एक ना एक समस्या डोकेवर काढत आहे. याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. विस्तीर्ण असे मैदान आणि भव्य इमारत दयनीय अवस्थेत आल्याने महापालिका प्रशासन आणि प्राथमिक शिक्षण मंडळ प्रशासन यांच्या निष्क्रिय भूमिकेमुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.